# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.04.2025** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात 51 हजारांहून अधिक तरुणांना नियुक्ती पत्रं प्रदान.

- कोणत्याही दहशतवादविरोधी कारवाईचे थेट प्रक्षेपण करण्यास माध्यमांना प्रतिबंध.

- पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन 'मन-की-बात' द्वारे साधणार संवाद.

आणि

- राज्याच्या काही भागांना जोराचे वारे, वीजांसह पावसाचा इशारा.

**मोदी रोजगार**

देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रम आणि नवनवीन उपक्रमांमधून राष्ट्र किती सक्षम आहे हे जगाला दाखवून देत आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त 51 हजारांहून अधिक तरुणांना दूरस्थ पद्धतीनं काल मोदी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यात आलं, त्यानंतर ते बोलत होते.

अर्थसंकल्पात सरकारनं उत्पादन अभियानाची घोषणा केली असून त्याचं उद्दिष्ट 'मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणं, देशातल्या तरुणांना जागतिक दर्जाची उत्पादनं बनवण्याची संधी देणं हे असून यामुळे लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच, लघु उद्योजकांना चालना मिळेल त्याचबरोबर देशभरात रोजगाराच्या नवीन संधीही खुल्या होतील, असं सांगताना मोदी म्हणाले.. . . . . .

**देश के युआवों के लिए रोजगार, स्वरोजगार के अवसर बढ़ें है |. Skill India, Startup India, Digital India, जैसे अनेक अभियान इस दिशा में युआवों के लिए नए अवसर बढ़ा रहे हैं | इन अभियान के माध्यम से हम भारत के युआवों को अपनी प्रतिभा दिखाने के लिए खुला मंच दे रहे हैं | मेरी आपको बहुत बहुत शुभकामना है, मुझे पूरा विश्वास है, आप पद की शोभा बढ़ाएंगे, देश वासियों का गर्व बढ़ाएंगे, और आपके जीवन को धन्य बनाने के लिए आप समय और शक्ति का सदुपयोग करेंगे |**

मुंबईत येत्या 1 ते 4 मे दरम्यान होणाऱ्या वेव्हज 2025 परिषदेमुळे डिजिटल कंटेंट क्षेत्राच्या भविष्याला नवी दिशा मिळेल असंही मोदी यांनी म्हटलं. पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते 200 नियुक्ती पत्रांचं वाटप करण्यात आलं. केंद्र सरकारच्या सेवेत रूजू झालेल्या तरूण पिढीनं आपलं संपूर्ण

आयुष्य नोकरीच्या माध्यमातून देश आणि जनसेवेसाठी समर्पित करावं असं आवाहन  नड्डा यांनी यावेळी केलं. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते.

**संरक्षण प्रसारण**

कोणत्याही दहशतवादविरोधी कारवाईचे थेट प्रक्षेपण करण्यास माध्यमांना  प्रतिबंध करण्यात आला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सर्व वाहिन्या, वृत्तसंस्था आणि समाज माध्यम वापरकर्ते यांना राष्ट्रीय सुरक्षिततेच्या हितासाठी सावधगिरी बाळगण्याचे आणि विद्यमान कायदे तसच नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेत संरक्षणविषयक कारवाईशी संबंधित कोणत्याही प्रकारचं "प्रत्यक्ष दृश्य प्रसारण किंवा "स्त्रोत आधारित" माहिती प्रसारित केली जाऊ नये असं स्पष्टपणे सांगितलं आहे. संवेदनशील माहिती उघड केल्याने शत्रुला त्याचा फायदा होऊन आपल्या संरक्षण दलांची कार्यक्षमता आणि सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. करगिल युद्ध, मुंबई दहशतवादी हल्ला आणि कंधार अपहरणाच्या घटनांची आठवण यासंदर्भात करून देण्यात आली आहे.

**फडणवीस भेट**

जम्मू काश्मीरमधील पहेलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पुण्यातील कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे यांच्या घरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल भेट देवून त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिलात त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावं, राज्यशासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरुन 'मन-की-बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 121 वा भाग आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असून त्यानंतर लगेचच विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येणार आहे.

**नड्डा**

देशात पावणेदोन लाख आयुष्मान आरोग्य मंदिरं बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असून मोठ्या प्रमाणात जगाला डॉक्टर्स आणि वैद्यकीय कर्मचारी पुरविण्याचा निर्धार केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी काल पुण्यात व्यक्त केला.  सिंबायोसिस रुग्णालय संशोधन केंद्रात नेफ्रोलॉजी आणि युरोलॉजी केंद्राचं उद्घाटन करताना ते बोलत होते. पूर्वी वैद्यकीय शिक्षण आणि सुविधांसाठी परदेशात जावं लागत असे, आज भारतातच जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्याचं नड्डा यावेळी म्हणाले.

**ग्राम विकास**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामविकास विभागानं उत्तम कामगिरी केली असून केंद्राकडून आणखी 10 लाख घरांना मान्यता मिळणार आहे त्यामुळं एकही व्यक्ती बेघर राहणार नाही यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला केलं आहे. पुण्यात 'यशदा' इथं ग्रामविकास आणि पंचायत राज विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते काल बोलत होते. ग्रामविकास विभागाच्या 100 दिवस कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेलं सिंगल युनिफाईड पोर्टल, संचालक ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय यांनी तयार

केलेलं आवास वितरण ॲप, भूमिलाभ पोर्टल,  महाआवास अभियान डॅशबोर्ड, आयुक्त मनरेगा नागपूर यांनी तयार केलेल्या पीएमएवाय आणि नरेगा डॅशबोर्डचं उद्घाटन आणि राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानाअंतर्गत बनविलेल्या चित्रफितीचं अनावरण फडणवीस यांच्या हस्ते कारण्यात आलं. राज्यातील 20 जिल्हा परिषदांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमावर आधारित पुस्तिकेचं तसंच महाआवास त्रैमासिकाचं प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.  राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसंच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक या कार्यशाळेला उपस्थित होते.

## विखे पाटील

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी काल पुणे जिल्ह्यातील पानशेत आणि वरसगाव धरणाची पाहणी केली. धरणातील गाळाच्या प्रमाणाचं सर्वेक्षण करून गाळ काढण्याच्या अनुषंगानं पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देवून वरसगाव धरणाची गळती कमी करण्याच्या उपाययोजनेबाबत सविस्तर अंदाजपत्रक करून कार्यवाही करावी अशा सूचना विखे-पाटील यांनी यावेळी दिल्या.

## पुस्तक

धरणग्रस्तांच्या व्यथा आजही दुर्लक्षित असून विस्थापितांचे प्रश्न आजही निरुत्तर आहेत, ही मोठी शोकांतिका आहे असं मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉक्टर माधव गाडगीळ यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. “सह्याद्रीचे अश्रू - धरणग्रस्त विस्थापितांचा संघर्ष” या ग्रंथाच्या निमित्तानं आयोजित विशेष चर्चेमध्ये ते बोलत होते. अनिल पवार  यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे.

## घुबड

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी तालुक्यातल्या  बांदा गावाची ओळख आता “घुबडांच गाव” अशी होऊ लागली आहे. त्यामुळे पर्यटनदृष्ट्याही बांदा गावाचं महत्व वाढल आहे. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

**निसर्गसंपन्नतेबरोबरच  जैवविविधता लाभलेल बांदा हे गोव्याच्या सीमेलगत असलेल गाव. या गावाची ओळख आता “घुबडांच गाव” अशी होऊ लागली आहे.  पक्षी निरीक्षक आणि  अभ्यासक प्रवीण सातोसकर आणि  त्यांच्या टीमन  तब्बल सात ते आठ दुर्मिळ जातींच्या घुबडांच्या प्रजातींना शोधण्याच काम केलंय. गेल्या वर्षभरात त्यांनी बांदा आणि  परिसरात 175 हून अधिक पक्ष्यांच्या विविध प्रजातींचा शोध घेतलाय त्यामुळे  बांदा हे पक्षी निरीक्षकांसाठी पर्वणी ठरतंय.  या भागात मासेमारी घुबड, तपकिरी वनघुबड, जंगली पिंगळा, ठिपकेवाला पिंगळा, बहिरी घुबड, श्रृंगी घुबड, बेडूकमुखी घुबड, कंठेरी शिगळा घुबड, गव्हाणी घुबड या घुबडांच्या प्रजातींचा समावेश आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एरव्ही 12 प्रकारची घुबडं सापडतात पण एकट्या बांदा गावात यातली आठ घुबड पाहायला मिळतात. त्यामुळे बांदा गावात हि घुबड पाहण्यासाठी पर्यटकांची पावलं वळू लागली आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी, सिंधदुर्गहून निलेश जोशी.**

## मृत प्राणी

राज्यात मृत झालेल्या पाळीव प्राण्यांना कुठंही टाकून दिलं जातं. त्यामुळे दुर्गंधी आणि आजार पसरतात. यावर उपाय म्हणून राज्य शासनानं सर्व मृत पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी सशुल्क स्मशानभूमी तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

**रेशीम धागा**

सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील कवठेएकंद इथं रेशीम धागा निर्मिती केंद्राची वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी काल पाहणी केली. या केंद्रावर 60 ते 70 स्थानिक मजूर काम करीत आहेत. या केंद्रामुळे सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीम कोष बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

**पहलगाम निषेध**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी काल रत्नागिरी शहरात मुस्लिम समाजातर्फे मोर्चा काढण्यात आला. राजापूर तालुक्यातल्या जमातुल मुस्लिमीन या संघटनेने तहसील कार्यालयाकडे निवेदन देऊन या हिंसेला ठोस प्रत्युत्तर द्यावं, असं आवाहनही सरकारला केलं आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीनं काल हिंगोली जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती .

**पापदंडेश्वर**

परळी वैद्यनाथ तालुक्यातील गाढे पिंपळगाव इथं दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री पापदंडेश्वराचा पालखी सोहळा काल पारंपरिक पद्धतीनं उत्साहात साजरा करण्यात आला.

**उष्माघात कक्ष**

नांदेड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रात स्वतंत्र उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. सर्व उष्माघात कक्षात रुग्णांसाठी आवश्यक त्या सर्व औषधी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**निधन**

नाशिक इथल्या  सार्वजनिक वाचनालयाचे माजी अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते मधुकर झेंडे काल  निधन झालं. ते 88 वर्षाचे होते. महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी, अखिल भारतीय नाट्य परीषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. 'नाशिकचा संदर्भकोश' म्हणूनदेखील त्यांना ओळखलं जायचं.

**निधन**

सांगली जिल्ह्यातील पैलवान संभाजी पाटील- सावर्डेकर यांचं काल निधन झालं. ते  78 वर्षांचे होते. कुस्तीबरोबरच विविध क्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्व अशी त्यांची ओळख होती.

**क्रिकेट**

पंजाब किंग्ज इलेव्हन आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यातील सामना काल  संततधार पावसामुळं पूर्ण झाला नाही. दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.

**हवामान**

नांदेड जिल्ह्यात काल सायंकाळी वादळी वारे आणि पावसाचा मोठा फटका बसला. एक शेतकरी, एक बैल आणि तीन शेळ्या अंगावर वीज पडून दगावल्या. उन्हाळी पिकांसह आंबे आणि इतर फळबागांचं मोठं नुकसान झालं.

सांगली जिल्ह्यातील पलूस आणि वाळवा तालुक्यात काल जोरदार पाऊस झाला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात यासोबत गारपिटीची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**